# <u>ऑनलाईन अर्ज सादर करण्यासंदर्भात सूचना</u>

१) उमेदवारास बेस्ट उपक्रमाकडे अर्ज करण्यासाठी उपरोक्त संकेतस्थळावरील नोंदणी प्रकिया **(Register)** ह्या विकल्पाचा वापर करून पूर्ण करणे गरजेचे आहे.

२) ऑन लाईन नोंदणीसाठी उमेदवाराजवळ **वाहन परवाना क्रमांक (आवश्यक), मोबाईल क्रमांक (आवश्यक) आणि ईमेल आयडी (वैकल्पिक)** असणे गरजेचे आहे.

३) नंतर स्क्रीनवर दर्शविल्याप्रमाणे त्याने आपला पासवर्ड बनवायचा आहे.

४) वरील माहिती भरल्यानंतर उमेदवाराने **(Register)** बटणावर क्लिक करावे.

५) उमेदवारास त्याने केलेल्या नोंदणीची माहिती **त्याच्या ईमेल आयडीवर (नोंदणी केली असल्यास) अथवा मोबाईल क्रमांकावर** पाठवली जाईल.

६) उमेदवारास ह्या नोंदणीनंतर **लॉगीन स्क्रीन** दिसू लागेल. त्यात त्याने **त्याचा नोंदणी केलेला वाहन परवाना क्रमांक हा युजर आयडी** म्हणून वापरावयाचा आहे. व त्यानंतर त्याने योग्य तो पासवर्ड टाईप करावा.

७) जर उमेदवार त्याचा पासवर्ड विसरला असेल तर त्याने **(Forget password)** ह्या विकल्पाचा वापर करावा.

८) उमेदवाराने लॉगीन केल्यानंतर **प्रोफाईल (Profile)** स्क्रीन दिसू लागेल. उमेदवाराने त्यात आपली वैयक्तीक माहिती, संपर्काची माहिती आणि वाहन परवान्याची माहिती भरावयाची आहे.

९) उमेदवाराने शेवटी २० ते ५० केबी पर्यंतचे आपले पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो) अपलोड करावयाचे आहे व त्याचबरोबर उमेदवाराने आपला वाहन परवाना, आधार कार्ड (किंवा रेशन कार्ड), उमेदवाराचा जन्मदाखला (किंवा शाळा सोडल्याचा दाखला) आणि शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती अपलोड कराव्यात.

१०) प्रोफाईल मध्ये माहिती भरुन पुर्ण झाल्यानंतर जर उमेदवारास त्यात काही सुधारणा करायची झाल्यास त्याने **(Edit Profile)** ह्या विकल्पाचा वापर करावा.

११) त्यानंतर उमेदवाराने ज्या कोर्सला प्रवेश घ्यावयाचा आहे तो कोर्स निवडण्यासाठी स्क्रीनवरील **(Courses)** ह्या विकल्पावर क्लीक करावे. ज्या कोर्सला प्रवेश घ्यावयाचा आहे त्याखालील **(Apply Now)** ह्या विकल्पावर क्लिक करावे.

१२) त्यानंतर उमेदवाराने कोर्स कालावधीच्या दिवसांची नोंद करावी. (फक्त Heavy Driving Refresher Training ह्या कोर्ससाठी).

१३) त्यानंतर उमेदवाराने त्याला सोयिस्कर असलेली कोर्सची वेळ निवडावी. (उमेदवाराची सदर कोर्ससाठी निवड झाल्यास त्याने निवडलेली वेळ उपलब्ध असेल तरच त्यास ती वेळ मिळू शकेल अन्यथा उमेदवारास दुसरी वेळ देण्यात येईल ह्याची कृपया उमेदवाराने नोंद घ्यावी).

१४) कोर्सची निवड केल्यानंतर नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी उमेदवाराने शेवटी **(I Agree Terms and condition)** हा पर्याय निवडून **(Apply Course)** वर क्लिक करावे.

१५) ह्यानंतर स्क्रिनवर उमेदवारास त्याने नोंदवलेली माहिती दिसेल. उमेदवाराने त्याच्या माहितीकरिता त्या प्रवेश पत्रिकेची प्रिंट काढावी. हीच माहिती **त्याने नोंदणी केलेल्या ईमेल आयडीवर (किंवा मोबाईल क्रमाकांवर)** सुद्धा पाठवली जाईल.

**१६) उमेदवाराने अर्ज केल्याच्या ३० दिवसाच्या आत दिंडोशी प्रशिक्षण केंद्र, दिंडोशी आगार येथे मूळ प्रमाणपत्रांसहित (वाहन परवाना, रहिवासाचा पुरावा, जन्मतारखेचा पुरावा, शैक्षणिक पात्रता इत्यादी) संपर्क साधावा.**